# University of Mumbai

क्र.एईएम/आयसीडी/१४२
२०| मे, २०२५.

**परिपत्रक :–**

संदर्भ :– १. पदवी प्रवेश प्रक्रियेबाबतचे परीपत्रक क्र. EM/ICC/2025-26/1 दिनांक ०६ मे, २०२५.
२. पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेबाबतचे परीपत्रक क्र. AEM/ICD/112/2025-26 दिनांक ०९ मे, २०२५.

मुंबई विद्यापीठांतर्गत असलेले विभाग तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, संस्था व इतर स्वायत्त महाविद्यालय यांचे विभागप्रमुख, प्राचार्य, संचालक यांना कळविण्यात येत आहे की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० च्या अनुषंगाने प्रवेश, नावनोंदणी, पात्रता व स्थलांतर प्रमाणपत्र विभागात शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची पदवी प्रवेश नावनोंदणी प्रक्रिया दिनांक ०८ मे, २०२५ पासून आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेश नावनोंदणी प्रक्रिया दिनांक १३ मे, २०२५ पासून ई-समर्थ संकेतस्थळावर सुरू झालेली आहे.

विद्यार्थ्यांनी **http://mu.ac.in/admission** या संकेतस्थळावर नावनोंदणी करणे अनिवार्य आहे. त्याचबरोबर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, संस्था व इतर स्वायत्त महाविद्यालयांमध्ये पदवी/पदव्युत्तर प्रवेश घेण्यास जे विद्यार्थी इच्छूक आहेत त्यांनी त्या महाविद्यालयाचेही ऑनलाईन किंवा ऑफ लाईन अर्ज भरणे देखील अनिवार्य आहे.

दरवर्षी मुंबई विद्यापीठांतर्गत असलेले विभाग तसेच विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, संस्था व इतर स्वायत्त महाविद्यालये गुणवत्ता यादी नुसार प्रवेशप्रक्रिया राबविते त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्येही गुणवत्ता यादी तयार करून संपुर्ण प्रवेशप्रक्रिया राबविण्यात यावी. (सोबत. पदवी प्रवेश प्रक्रियेबाबतचे परीपत्रक क्र. EM/ICC/2025-26/1 दिनांक ०६ मे, २०२५. आणि पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेबाबतचे परीपत्रक क्र. AEM/ICD/112/2025-26 दिनांक ०९ मे, २०२५. जोडत आहे.)

(डॉ पुजा रौंदळे)
संचालक,
परीक्षा व मुल्यमापन विभाग मंडळ